सायंदैनिक साईमत TM

* इंटरनेट आवृत्ती http://dainiksaimat.in

वर्ष १२ वे | अंक ५४ | बुधवार, दिनांक १२ डिसेंबर २०१८ | पाने ८



# भारतात ठिबक सिंचन रुजविणारे डॉ. भवरलालजी जैन

***'माझा सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचे हास्य!' असे जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भवरलालजी जैन म्हणत. तेवढ्याच तन्मयतेने त्यांनी कृषी, शेती आणि शेतकरी बांधवांच्या विकासासाठी आपले आयुष्य बहाल केले आणि भारताच्या विकाससंदर्भात आपली दूरदृष्टि राखून पाऊल पुढे टाकत नव्या तंत्रज्ञानाचा आविष्कार केला. उच्च कृषी तंत्रज्ञानाद्वारे शेतकरी तथा कृषी व्यवसायाला समृद्ध करणारे, डॉ. भवरलालजी जैन तथा मोठे भाऊ यांचा आज १२ डिसेंबर रोजी जन्मदिवस त्यानिमित्ताने...***

डॉ. भवरलालजी जैन यांना सगळे आदराने मोठेभाऊ म्हणत. मोठेभाऊ एक असे व्यक्तिमत्व होते ज्यांनी कोणत्याही कार्याला लहान-मोठे कार्य असा भेद न ठेवता त्या कामाला तडीस नेले. त्याकरिता ते स्वत:ला पूर्णपणे झोकून देत असत. १५-१८ तास ते काम करत असत. मग ते कार्य कारखान्याच्या संशोधनाचे असो, विकास किंवा सामाजिक उन्नतीच्या संदर्भात असो, त्या कामाला ते पूर्ण मेहनतीने करत असत.

प्रख्यात, उद्यमी, शेती आणि गांधी विचारधारेचे प्रचारक, चिंतक अशी ओळख असलेले डॉ. भवरलाल जैन यांनी जळगावसहित संपूर्ण भारत देशाचं नाव सातासमुद्रापार नेलं. मोठ्याभाऊंशी परिचित नसेल असा एकही शेतकरी नाहीच. कृषी क्षेत्राबरोबरच साहित्य आणि आपल्या उच्च कृषितंत्रज्ञानाद्वारे भरीव कार्य करीत भवरलालजी जैन यांनी शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध केले.

अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या छोट्याशा वाकोद खेडेगावात जन्मलेल्या मोठ्याभाऊंनी उच्चशिक्षित असताना नोकरीवर आणि त्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या मानमरातबीवर अवलंबून न राहता स्वत:च्या हिमतीवर स्वाभिमानाने कृषि संस्कृतीशी निगडीत उद्योग व्यवसाय सुरू केला. आईला दिलेला शब्द खरा करण्यासाठी आणि यशापयशाचे सुखदु:खद अत्यंत भयानक धक्के सहन करूनही आत्मविश्वासाने उद्योगक्षेत्रातला निष्ठावंत, कर्तबगार 'भूमिपुत्र' म्हणून ख्यातनाम झाले ही सर्वच शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायक बाब आहे. रुढ अर्थाने शालेय शिक्षण नसलेल्या मातेकडे उपजत शहाणपण आणि व्यावहारिक नीतिमत्तेचे ज्ञान, भान मोठ्या प्रमाणावर होते. नोकरी करण्यापेक्षा तू असे काही निर्माण कर ज्यात तुझे आणि आपल्या परिवाराचे पोट भरेल असे नव्हे तर पशु-पक्षांचे देखील पोट भरले पाहिजे.'' आईचा शब्दनशब्द त्यांच्यासाठी प्रेरणादायी! आईने त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी तीन पिढ्यांची बचत केलेले सात हजार रुपये दिले. या बीजभांडवलावर वर्ष १९६३ मध्ये जैन ब्रदर्सची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला केरोसीन (रॉकेल) विक्री केली. नंतर शेतीशी निगडीत व्यवसाय जसे बी. बियाणे, खते ट्रॅक्टर, पाइप इत्यादींची एजन्सी त्यांनी घेतली. कालानुक्रमे व्यावसायिक आलेख वाढत गेला.'बारा हजार पेक्षाही अधिक सहकाऱ्यांचा समूह असलेल्या आजच्या जैन इरिगेशन कंपनीचा भरभक्कम पाया आदर्श कार्यसंस्कृतीमुळे झाला आहे. कॅलिफोर्नियाच्या फ्रेसनो येथे १९८५ मध्ये ठिबक सिंचन तंत्रज्ञानाविषयी माहिती जिज्ञासापूर्वक जाणून घेतल्यानंतर भारतात ठिबक सिंचनाची सुरूवात भाऊंनी केली. शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे जीवन सर्वदृष्ट्या उंचावण्यासाठी त्यांनी ठिबक सिंचन तंत्रज्ञान भारतात आणले. भाऊंच्या याच विचारांनी आज भारत देशातील लाखो शेतकरी ठिबक सिंचनाचा वापर करत जलबचती बरोबरच उत्तम व दर्जेदार पीक योग्य प्रमाणात पाणी या तत्वानुसार घेत आहेत. शेतकऱ्यांना केळी, डाळींब स्ट्रॉबेरीचे रोगमुक्त रोप उपलब्ध करून देण्यासाठी जैव प्राद्योगिकी क्षेत्रातही पदार्पण केले. 'टिश्यूकल्चर'च्या माध्यमातून जैन उद्योग समूहाने खूप मोठे काम साकार केले आहे.

भारताचा कृषिकार्यातला विकास घडवून आणण्यासाठी आपल्या विचारांना नवसंशोधनाची, नवतंत्राची आणि व्यावहारिकतेची विलक्षण जोड देत मोठ्याभाऊंनी आपले लक्ष्य निश्चित केले. अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विकास कसा केला जाईल, हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन भवरलालजी जैन यांनी ठिबक सिंचनाच्या तंत्रज्ञानात सुधार करीत कृषी क्षेत्रातील विज्ञाननिष्ठ प्रयोगशीलता वाढविली. जगात जे काही नवीन तंत्रज्ञान असेल ते समजून घेतले व त्यास आपल्या क्षेत्रात कार्यान्वित केले. ज्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊ लागली आणि त्यांच्या वेळेची, पाण्याची, श्रमाचीही बचत होऊ लागली. परिणामी जैन इरिगेशनवर शेतकऱ्यांचा विश्वास कामाच्या गुणवत्तेमुळे आणि शेतकऱ्यांनी साधलेल्या प्रगतीमुळे दृढ होत गेला.


'जैन ब्रदर्स' नावाने वर्ष १९६३ मध्ये भाऊंनी व्यवसायास सुरुवात केली. पुढे जैन इरिगेशनची १९८७ साली स्थापनाझाली. आज जगातील ३० देशांमध्ये आपले उत्पादन केंद्र तसेच अनुसंधानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उत्पादन उपलब्ध करून दिले आहे. जगभरातील शेतकरी जैन इरिगेशनच्या तंत्रज्ञानाचा वापर करून आज दुप्पट उत्पादन घेत आहेत. जैन इरिगेशन आजच्या घडीला केवळ कृषीशी संबंधित सिंचनच नव्हे तर शेतीच्या अधिकाधिक घटकापर्यंत आपले योगदान देत आहे. जैन इरिगेशन कंपनी कृषी सहीत साहित्य, कला, शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रात शिक्का उमटवून आहे. उच्च कृषी तंत्रज्ञानाबरोबरच पाणीबचत क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कार्य केले, यासाठी कंपनीला अनेक सन्मान, पुरस्कार प्राप्त झाले आहेत, होत राहतात.

**सार्थक करूया जन्माचे,**
**रूप पालटू वसुंधरेचे।।**

या जीवनलक्ष्यानुसार भाऊंनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली व उद्योगाबरोबरच कृषी क्षेत्राला नवे रूप प्रदान केले. मोठ्याभाऊंनी कार्य हेच जीवन, जीवन हेच कार्य मानले. त्याच कार्यसंस्कृतीला अनुसरून आज जैन इरिगेशन कंपनीचा आलेख उंचावला आहे. मोठ्याभाऊंचे चार सुपुत्र- अशोकभाऊ जैन, अनिलभाऊ जैन, अजितभाऊ जैन व अतुलभाऊ जैन समर्थपणे कंपनीची प्रगती साध्य करून सामाजिक बांधलकीचे व्रत जोपासत आहेत. जैन परिवाराच्या तिसऱ्या पिढीतही हीच उद्योग संस्कृती संस्कारित झाल्यामुळे कंपनीचा पाया अधिक मजबूत झाला आहे. अनिलभाऊ जैन यांचे सुपुत्र मोठ्याभाऊंचे नातू अथांगभाऊ जैनदेखील कंपनीच्या व्यवसायात 'जैन फार्मफ्रेश फूडस्' विभागाचे संचालक या नात्याने भविष्यदर्शी कार्याला सुरूवात केली आहे.

सामाजिक बांधिलकीचे व्रत कृतज्ञतापूर्वक फाउण्डेशनच्या माध्यमातून जपले जाते. आरोग्यसंवर्धक शिबीरे आयोजित केली जातात. शिक्षणक्षेत्रात गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लेखक-कवींना, साहित्य संस्थांना कवयित्री बहिणाबाई चौधरी, बालकवी ठोंबरे, कविवर्य ना. धों. महानोर साहित्य पुरस्कार दिले जातात. जैन स्पोटर्स अकॅडमीच्या माध्यमातून खेळ तथा नृत्य, साहित्य, कला आदी क्षेत्रातील गुणीजनांना सहकार्य करून प्रोत्साहित केले जाते.

युवा पिढीला पश्चिमी संस्कृतीच्या प्रभावापासून दूर ठेवण्यासाठी जळगाव शहरातच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभूती इंटरनॅशनल स्कूल सुरू केली आहे. उद्याच्या भारतातील संस्कारशील उद्योजक आणि आदर्श नागरीक अनुभूतीत घडावे अशी या शाळेची योजना आहे. आर्थिकदृष्या मागासलेल्या कुटुंबातील मुला-मुलींना इंग्रजी माध्यमातून उत्कृष्ट शिक्षण देण्याच्या उद्देशाने भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन मल्टिपर्पज फाउण्डेशनद्वारा जळगाव शहरात अनुभूती इंग्लिश मिडियम स्कूलची स्थापना केली. शैक्षणिक अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना



शिक्षण सुलभ व्हावे यासाठी या अनिवासी शाळेत विद्यार्थ्यांना युनिफॉर्म, पुस्तक, सकस आहार व वैद्यकीय देखरेख आदी सेवासुविधा विनामूल्य दिल्या जातात.

भाऊंचा जीवनकाळ संघर्षपूर्ण आणि प्रेरक राहिला आहे. अपार कष्ट करण्याबरोबरच भाऊंना ग्रंथ वाचन-लेखनात खूप रस होता. मराठी, हिंदी आणि इंग्रजीतही त्यांनी लेखन केले. 'ऑन आँत्रप्रन्युअर डिसायफर्ड','द एनलायटण्ड आँत्रप्रन्युअर' ही इंग्रजीतून लिहिलेली पुस्तके. त्याचबरोबर 'ती आणि मी' हे त्यांचे आत्मकथनपर हृदगत लोकप्रिय आहे. त्यांच्या धर्मपत्नी कांताई बरोबर व्यतीत केलेला जीवनकाल व घटनांवर आधारित हे पुस्तक आहे. याच पुस्तकाचे पुढे 'वो और मैं' आणि इंग्रजीत -'ड्हश चश' प्रकाशित झाले. भारतीय संस्कृती आणि सुसंस्कृत संयुक्त कुटुंबसंस्थेचे चित्रण 'ती आणि मी' पुस्तकात समाविष्ट आहे. नव्या पिढीला या पुस्तकातून दिशा निश्चितच मिळेल. 'ती आणि मी' पुस्तकाच्या एक लाखाहून अधिक प्रती वाचकांपर्यंत पोहचल्या असून अनेक घरांचे घरपण या पुस्तकाने जपले आहे.

**गांधी तीर्थ**

भाऊ ज्याप्रमाणे संस्कारशील होते तसेच त्यांचे वैचारिक अधिष्ठानही खोलवर रूजलेले होते. नव्या पिढीला हे वैचारिक अधिष्ठान प्राप्त व्हावे याकरिता गांधी तीर्थ अर्थात गांधी रिसर्च फाउण्डेशनची स्थापना केली. महाराष्ट्रातील जळगाव शहरात जैन हिल्स येथे ८१ हजार चौरस फूट क्षेत्रात निर्माण केलेले गांधी तीर्थ एक बहुआयामी आणि मार्गदर्शक संग्रहालय आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे जीवन, त्यांचे आदर्श, अहिंसेची त्यांनी दिलेली शिकवण, स्वातंत्र्य लढ्यातील गांधीजींचे योगदान, शांती आणि क्षमाशील जीवनाचे आचरण असे अनेक पैलू गांधी तीर्थ सचित्र आणि अभ्यासपूर्ण दर्शवितो. गांधी तीर्थाला जगातील पहिले ऑडिओ गाईडेड संग्रहालय म्हणून ख्याती प्राप्त केली आहे. हजारो शाळातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गांधी तीर्थला भेट दिली असून लाखो विर्द्यार्थ्यांनी 'गांधी विचार संस्कार परिक्षा' दिली आहे.

उद्योगी, समाजसेवी, शेतकऱ्यांचे हित जपणारे भूमिपुत्र म्हणून भवरलालजी जैन यांची ख्याती आहे. सर्वांच्या हृदयात त्यांना आपुलकीचे, मानाचे स्थान आहे. देशातील करोडो शेतकऱ्यांचे जीवनमान समृद्ध करण्याकरिता भाऊ कायम श्रमप्रतिष्ठेचा अंगीकार करीत राहिले. भाऊंनी नेहमी नावीन्याचा शोध घेतला. या शोधामुळेच शेतीसारख्या पारंपरिक व्यवसायाला आधुनिकतेची जोड दिली. भाऊंनी दिलेला श्रमाचा, नावीन्याचा वारसा जपत असतानाच भविष्याचा वेध घेऊन कंपनी वाटचाल करत आहे. त्यादृष्टीने भाऊंची चारही सुपुत्र मा. अशोकभाऊ, अनिलभाऊ, अजितभाऊ आणि अतुलभाऊ या उद्योगाची कमान पुढे नेत आहेत. तितक्याच तन्मयतेने, ज्याप्रमाणे मोठ्याभाऊंनी हा उद्योग साकारला, त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी देखील जोपासली जाते आहे.

मोठ्याभाऊंनी संस्कारित केलेले जीवनव्रत 'कार्य हेच जीवन, जीवन हेच कार्य' यानुसार जैन कंपनी व सहकारी कार्य करत आहे. सदैव सकारात्मक विचारसरणी, कामातच मग्न राहण्याची वृत्ती, कठोर परिश्रम आणि पर्यावरणाबाबत असलेली जागरुकता, सद्गुणांचे बीज त्यांनी सहकाऱ्यात संस्कारित केले आहे. आदर्श कार्यसंस्कृतीच्या रूपाने मोठेभाऊ सदैव आपल्या सोबत आहेत.

**– आसिफ शेख**
मीडिया विभाग, जैन इरिगेशन सिस्टिम्स.
लि. जळगाव,मो. ९८८१०५७८६८